आधुनिक विचारांचे
# वर्तमान

बीड । बुधवार, २० एप्रिल २०२२ । वर्ष : ४ — आपले वृत्तपत्र, आपला आवाज — अंक : २४ । पाने : ४ । मूल्य २ ₹

एडिटर डेस्क

## शेतकरीपुत्र ते यशस्वी उद्योगपती

पात्रुडसारख्या अतिग्रामीण भागात शिवप्रसाद आसाराम भुतडा यांचा शेतकरी कुटुंबात जन्म झाला. अतिशय बिकट परिस्थितीवर मात करीत शिवप्रसाद भुतडा यांनी जय महेश उद्योग समूह शून्यातून विश्वाकडे नेला आहे.



भारतातील पहिली व्हेईकल बँक काढण्याचा मान भुतडा यांच्या नावावर आहे. वाहन संबंधी सर्व कामे एकाच छताखाली व्हावीत हे स्वप्न सत्यात उतरवणारे शिवप्रसाद भुतडा हे केवळ महाराष्ट्रच नाही तर भारतातील सहकार क्षेत्रातील आयडॉल म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. माजलगावसारख्या ग्रामीण भागात जय महेश नावाचे उद्योग साम्राज्य उभारणारे शिवप्रसाद भुतडा आज राज्यातील महत्त्वपूर्ण उद्योगपती म्हणून नावारूपास येत आहेत. 'जय महेश'च्या यशात ग्राहकांचे समाधान दडलेले आहे. सामान्य माणसांना त्यांची स्वप्न सत्यात उतरविणारे शिवप्रसाद भुतडा अतिशय शून्यातून आलेले आहेत. परिश्रमाला सर्वोच्च प्राधान्य देत भुतडा यांची यशस्वी वाटचाल अचंबित करणारी आहे. पात्रुड ते पुणे आणि आता संपूर्ण भारत जय महेश उद्योग समूह व्यापणार आहे. येत्या २०२५ पर्यत जय महेश आपल्या कार उद्योगाची व्याप्ती संपूर्ण देशात नेणार आहे. अतिशय सचोटी आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर जय महेश उद्योग समुहाने वाहन क्षेत्रात जी गरूडझेप घेतली आहे, त्याला तोड नाही. जवळपास १० हजारपेक्षा अधिक चालकांना मालक करण्याची किमया जय महेश उद्योग समुहाने केली आहे. याचे श्रेय उद्योग समुहाचे सर्वेसर्वा शिवप्रसाद भुतडा यांच्यासह त्यांच्या टीमला जाते. जय महेश उद्योग समूह विविध माध्यमातून जनसेवेसाठी कार्यरत आहे. जय महेश ऑटो मॉल इंडीया प्रायव्हेट लिमिटेड, जय महेश इशुरन्स मार्केटिंग प्रायव्हेट लिमिटेड या कंपन्यांसह कारउद्योग हा ऑनलाईन प्लॅटफॉर्म ग्राहकांसाठी उपलब्ध आहे. सामान्य माणसांच्या सुख-दुःखात शिवप्रसाद भुतडा हे नेहमी धावून जातात. किंबहुना याच सामाजिक बांधीलकीमुळे हजारो लोकांच्या जीवनात आनंद पेरण्याचे शिवप्रसाद भुतडा यांच्या मार्गदर्शनाखाली जय महेश उद्योग समूह करत आहे. वाहन इशुरन्स क्षेत्रातही शिवप्रसाद भुतडा यांचा दबदबा आहे. म्हणूनच त्यांना श्रीराम फायनान्स या कंपनीचा इशुरन्स क्षेत्रातील पॅन इंडीया बेस्ट बिझनेस अवॉर्ड सलग दोनदा प्राप्त झाला आहे. सहकार क्षेत्रात वेगळी उंची गाठणाऱ्या जय महेश उद्योग समुहाने अनेक बाबतीत आपले अढळ स्थान निर्माण केलेले आहे. २०13 ते २०१४ या वर्षात संपूर्ण मराठवाड्यात आठशे ऑटो फायनान्स केल्याचा विक्रमही भुतडा यांच्या नावावर आहे. वाहन क्षेत्रातील विविध विक्रमही आणि पहिलावहिला मान जय महेश उद्योग समुहाला मिळतो. शेतकरी कुटुंबातून भुतडा आलेले असल्याने शेतीबद्दल त्यांना प्रचंड आस्था आहे. शेतकरीपुत्र ते यशस्वी उद्योगपती असा भुतडा यांचा प्रवास एखाद्या सिनेमाच्या कथेसारखा पुढे सरकत आहे. समाजातील शेवटच्या घटकांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी भुतडा सतत विकासात्मक काम कारत असतात. आज पुण्यासारख्या ठिकाणी संस्थेचे कॉर्पोरेट कार्यालय आहे. नव्यानेच लातूर या ठिकाणी ऑटो मॉलची स्थापना केली. विश्वासार्हतेच्या जोरावर नवे-नवे संकल्प राबवून ते यशस्वी करून दाखविण्याचा हातखंडा शिवप्रसाद भुतडा यांच्याकडे आहे. आपल्या उद्योग समुहाचे एवढे साम्राज्य निर्माण केल्यानंतर जय महेश उद्योग समूह देशपातळीवर नेण्यास माझे सर्व संचालक मंडळ तत्पर आहे. यशाची गणिते मांडताना सहकाऱ्यांचा समन्वय आणि विश्वास मोलाचा असतो, हा मूलमंत्र जय महेश उद्योग समुहाने सत्यात उतरविला आहे. गेली दोन दशके जय महेश उद्योग समुहाने संघर्षाची खडतर परिश्रमाची पाहिली आहेत. यापुढेही हा उद्योग समूह अशीच झेप घेईल, अशी सदिच्छा व्यक्त करून शेतकरीपुत्र ते यशस्वी उद्योगपती असा थक्क करणारा प्रवास करणाऱ्या शिवप्रसाद भुतडा यांच्या कार्याला 'वर्तमान'चा सलाम!

# जय महेश उद्योग समूह
# ब्रँण्ड इज ब्रँण्ड




**वाहन क्षेत्रात जय महेश उद्योग समुहाने अढळ स्थान निर्माण केले आहे. विश्वासार्हता आणि दर्जेदार सेवा दोहोंच्या जोरावर जय महेश उद्योग समुहाची वाटचाल सुरू आहे. जय महेश उद्योग समूह लोकाभिमुख होताना त्यामागचा पराकोटीचा संघर्ष लक्षात घेतला पाहिजे. वाहन क्षेत्रातील कोणतीही समस्या असो, ती सोडवण्याचे सोलुशन जय महेश उद्योगाकडे आहे. केवळ वाहनांना कर्ज वाटप करणारी व्हेईकल मल्टीस्टेट उभारण्याचा भारतातील पहिला मान जय महेश उद्योगाला दिला जातो. माजलगावसारख्या ग्रामीण भागातून सुरू झालेला जय महेश उद्योग समुहाचा प्रवास जेवढा अचंबित करणारा आहे. तेवढाच तो उद्योग जगतासाठी प्रेरणादायी आहे. वाहनांसंबंधी एका छताखाली सर्वच कामे खात्रीने करणारा जय महेश उद्योग समूह आज एकमेवाद्वितीय आहे. व्हेईकल क्षेत्रातील जय महेश उद्योग समूह हा ब्रँण्ड इज ब्रँण्ड झाला आहे.**



### कव्हरस्टोरी

**बाबा श्रीहरी देशमाने**

सामान्य माणसांना चालकापासून मालक बनविण्याची किमया जय महेश उद्योग समुहाने केली आहे. ज्या ग्राहकांना काही बँकांची दरवाजे बंद होती, अशा गरजू आणि गरीब ग्राहकांना जय महेश उद्योग समुहाने आपल्या बँकेतून कर्ज दिले. सुलभ हप्त्याने त्याची परतफेडही केली. अशी हजारो चालक आज मालक म्हणून स्वाभिमानाने उद्योग करत आहेत.

जय महेश उद्योग समुहाने आर्थिक पाठबळ देवून अनेकांच्या जीवनात नवी पहाट निर्माण केली आहे. 'मैं अकेला ही चला था जानिब-ए-मंज़िल मगर, लोग साथ आते गए और कारवाँ बनता गया' या ओळीप्रमाणे जय महेश उद्योग समुहाचे सर्वेसर्वा शिवप्रसाद भुतडा यांचा तंतोतंत प्रवास आहे. सन १९९७ पासून माजलगावसारख्या ग्रामीण क्षेत्रात शिवप्रसाद भुतडा यांनी जय महेश ऑटो मॉलच्या माध्यमातून वाहन व्यवसायात पाय ठेवले. हा उद्योग क्षेत्राचा कारवाँ पुढे घेऊन जात असताना शिवप्रसाद भुतडा यांनी मागे वळून कधी पाहिलेच नाही. बदलत्या काळानुसार शिवप्रसाद भुतडा यांनी आपल्या व्यवसायात अमुलाग्र बदल केला. वाहन क्षेत्रातील दलांलाकडून होणारी ग्राहकांची फसवणूक रोखण्याचे काम जय महेश उद्योग समुहाने केले. ग्राहकांच्या अडचणी आणि समस्या आपल्या समजून त्या कशा सोडवल्या जातील. यावर भुतडा यांनी भर दिला. सामान्य ग्राहकांना विश्वास दिला. केवळ विश्वासाच्या जोरावरच 'जय महेश'चे साम्राज्य निर्माण होवू शकले, असे मत शिवप्रसाद भुतडा यांनी व्यक्त केले.

ड्रायव्हिंग लायसन्स, ड्रायव्हिंग स्कूल आणि वाहन इशुरन्ससह इतर सर्व वाहन विषयक कामे जय महेश उद्योग समूह करत आहे. आज संपूर्ण महाराष्ट्र राज्य जय महेश उद्योग समुहाने व्यापले आहे. येणाऱ्या २०२५ सालापर्यंत जय महेश उद्योग समुहाचे काम संपूर्ण देशभर पोहचलेले असेल, अस माणस शिवप्रसाद भुतडा आणि त्यांची टीम व्यक्त करत आहे. राज्यभरातील इतर बँका, पतसंस्था, मल्टिस्टेट वाहनांना कर्ज देण्याबाबत उदासीन असल्याचे जय महेश उद्योग समुहाच्या लक्षात आले. हीच समस्या संधी म्हणून जय महेश उद्योग समुहाने हेरली आणि गरजवंतांना वाहनांसाठी कर्जे वाटप केली. ग्राहकांना आपल्या आवडीचे आणि आवाक्यातले वाहन मिळवून देण्यासाठी जय महेश उद्योग समूह प्रामाणिक काम करत आला आहे. ग्राहकांची होणारी फसवणूक टाळण्यासाठी पारदर्शक कारभाराची गरज आहे. याच हेतूने जय महेश व्हेईकल मल्टीस्टेटची निर्मिती झाली. आरटीओ संबंधीची छोटी-छोटी कामे असो की, इशुरन्स संबंधी प्रश्न अगदी कमीत-कमी दस्तावेज असतानाही काही तासांमध्ये वाहन धारकाला कर्ज मंजूर केले जाते. याच तत्परतेमुळे आज वाहन क्षेत्रात जय महेश उद्योग समुहाचा कोणी हात धरू शकत नाही, असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. जय महेश ऑटो मॉल महाराष्ट्रभर खरेदी-विक्रीचा व्यवसाय करते.

जय महेश उद्योग समुहाने तत्पर सेवेबरोबरच गुणवत्तेला प्राधान्य दिले आहे. श्रीराम फायनान्स या नामांकित कंपनीने सलग दोन वेळा 'पॅन इंडीया बेस्ट बिझनेस अवॉर्ड' देण्यात आला आहे. दुबई आणि हैदराबाद या दोन ठिकाणी शानदार सोहळ्यात शिवप्रसाद भुतडा यांना पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले आहे. या पुरस्कारासह अनेक सन्मान शिवप्रसाद भुतडा यांना प्राप्त झालेले आहेत. जय महेश उद्योग समूह माजलगाव तालुक्यातील कर्तृत्ववान व्यक्तींचा सन्मान करते. जय महेश उद्योग समूह सामाजिक बांधिलकीतून अनेक उपक्रमांना मदत करते. शिवजन्मोत्सवानिमित्त सामुहिक विवाह सोहळ्यातील येणाऱ्या हजारो शिवभक्तांना अन्नदान करण्याचे काम जय महेश उद्योग समूह करत आहे.

### असा आहे जय महेश उद्योग समूह

जय महेश ऑटो मॉल इंडीया प्रा.लि
जय महेश इशुरन्स मार्केटिंग प्रा.लि.
जय महेश व्हेईकल मल्टीस्टेट
कारउद्योग (ऑनलाईन प्लॅटफॉर्म)
वैद्यनाथ मोटार ड्रायव्हिंग स्कूल

जय महेश ऑटो मॉलच्या माध्यमातून हजारोंना रोजगार उपलब्ध झाला आहे. तर जय महेश इशुरन्स मार्केटिंग प्रायव्हेट लिमिटेडच्या माध्यमातून इशुरन्स संबंधी सर्व कामे घरपोच केली जातात. तर जय महेश व्हेईकल मल्टीस्टेट देशातील एकमेव नोंदणीकृत व्हेईकल मल्टीस्टेट आहे. गेल्या दोन दशकांपासून जय महेश उद्योग समूह वाहन क्षेत्रात कार्यरत आहे. शिवप्रसाद भुतडा यांनी युज्ड कारच्या व्यवसायाला नवे स्वरूप दिले आहे. जय महेश ऑटो मॉलमधून खरेदी केलेली कोणतीही कार ग्राहक चार वर्षांनंतर मॉलला विकू शकतात. या सुविधेमुळेही जय महेश उद्योग समुहाला ग्राहक पसंती देतात. अशा प्रतिक्रीया अनेक ग्राहकांनी दिल्या आहेत. आज पुणे येथे जय महेश उद्योग समुहाचे कॉर्पोरेट कार्यालय आहे. तर लातूर येथे भव्य ऑटो मॉल सुरू करून वाहन व्यवसायातील इच्छुकांना नवे दालन उघडून दिले आहे.

### 'जय महेश'ची सक्सेस टीम

कोणताही उद्योग समूह उभारणीत संचालक मंडळाचे योगदान नाकारून चालत नाही. जय महेश उद्योग समुहाच्या उभारणीतही चेअरमन शिवप्रसाद भुतडा यांच्यासह भुतडा यांच्या खांद्याला खांदा देवून काम करणाऱ्या सर्वांचेच योगदान मोठे आहे. जय महेश व्हेईकल मल्टीस्टेटचे सचिव राम जगताप, व्हाईस चेअरमन महेश भुतडा, सीईओ कैलास सारडा, संचालक दिगंबर महाजन, जय महेश ऑटो मॉलचे संचालक उज्वल भुतडा, संचालक रमन दरगड, सीईओ प्रेम कदम या सर्वांचा समन्वय आणि करण्याची शैली जय महेश उद्योग समुहाला यशोशिखरावर नेण्यासाठी कारणीभूत ठरली. टीममधील प्रत्येकांच्या संकल्पना आणि सूचनांना प्राधान्य देत प्रत्येक जण 'जय महेश'च्या विकसात भर घालत आहे, अशी प्रतिक्रिया राम जगताप यांच्यावर यांनी दिली. 'जय महेश'साठी सक्षम टीम, सक्सेस टीम ठरली त्यामुळेच 'जय महेश'चा डोलारा अधिक बहरत आहे.

### कोरोना लढ्यात कर्मचाऱ्यांना पाठबळ

कोरोना लढ्यात जय महेश उद्योग समुहाने सामाजिक जाणिवा ठेवत आपल्या कर्मचाऱ्यांना प्रत्येकी दहा हजार रूपये ॲडव्हान्स देवून पाठबळ दिले. ऐरवीही जय महेश उद्योग समूह आपल्या कर्मचाऱ्यांच्या सुख-दुःखात सहभागी असतो. सामाजिक जाणिवेतून प्रत्येक कर्मचाऱ्याला आपल्या घरातील सदस्य म्हणून त्यांचे प्रश्न समजून घेऊन ते सोडविण्याचा प्रयत्न केला जातो. माजलगाव शहरातील बायपास मार्गावर नव्याने उभारलेले श्री बालाजी मंदिर शहराच्या वैभवात भर घालत आहे. या मंदीर उभारणीत जय महेश उद्योग समुहाचे सर्वेसर्वा शिवप्रसाद भुतडा यांचे महत्त्वपूर्ण योगदान आहे.

# ग्राहकांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देणारा उद्योग समूह

## जय महेश व्हेईकल मल्टीस्टेटचे सीईओ कैलास सारडा यांची माहिती

### स्पेशल इंटरव्हू

**भगीरथ तोडकरी**

माजलगाव : जय महेश उद्योग समुहाचा ऑटो मॉल वाहनासंबंधी सर्व सुविधा एका छताखाली देणारा रोलमॉडेल ठरत आहे. राज्यातील एकमेवाद्वितीय ऑटो मॉल उभारला आणि तो विश्वासपात्र ठरला याचे श्रेय सामान्य माणसाला दिले पाहिजे. एकीकडे पाच हजारांवर चालकांना आम्ही वाहनांचे मालक बनविले आहे. याचा अभिमान वाटतो, अशा शब्दात जय महेश व्हेईकल मल्टीस्टेटचे सीईओ कैलास सारडा यांनी 'वर्तमान'शी बोलताना आपल्या भावना व्यक्त केल्या.

जय महेश उद्योग समूह आज वाहन क्षेत्रात यशाची नवनवी क्षेत्रे काबीज करत आहे. या पार्श्वभूमीवर जय महेश व्हेईकल मल्टीस्टेटचे मुख्य कार्यकारी अधिकारी कैलास सारडा म्हणाले, जय महेश उद्योग समुहाचा पाया ग्रामीण भागातील माजलगाव येथून सुरू झाला. आज पुणे येथे कॉर्पोरेट मुख्यालय आहे. लातूर येथे ऑटो मॉल प्रारंभ झालेला आहे. माजलगाव शहर आणि परिसरातून जय महेश ऑटो मॉलला मिळालेला प्रतिसाद पाहून उत्तर महाराष्ट्र आणि राज्यभर व्यापक प्रमाणात जय महेश उद्योग समुहाचे काम सुरू आहे. वाहनासंबंधी सर्व सुविधा पुरविणारे जय महेश व्हेईकल मल्टीस्टेट ही राज्यातीलच नव्हे तर देशातील एकमेव संस्था आहे, याचा माजलगावकर म्हणून सार्थ अभिमान वाटतो. ड्रायव्हिंग स्कूल, आरटीओ सेवा, व्हेईकल इशुरन्स, व्हेईकल खरेदी-विक्री, फायनान्शियल हेल्प यासह वाहनासंबंधी सर्व शंकानिरसन आणि सुविधा जय महेश उद्योग समूह अविरतपणे देत आहे. विश्वासार्ह सेवा हा जय महेश उद्योग समुहाचा आत्मा आहे. या उद्योग समुहाचे



सर्वेसर्वा तथा माझे प्रेरणास्थान शिवप्रसाद भुतडा यांची काम करण्याची पद्धत आणि कल्पकता पाहून माझ्यासारख्या टीममधील प्रत्येकालाच नवी ऊर्जा मिळते. अगदी शून्यातून सुरू झालेला जय महेश उद्योग समुहाचा प्रवास अविरतपणे सुरू आहे. जय महेश व्हेईकल मल्टीस्टेटने दिलेल्या सुविधांमुळे हजारो ग्राहकांना त्याचा फायदा झाला आहे. वाहन क्षेत्रात गेली दोन दशके जय महेश उद्योग समूह आपले पाय रोवून आहे. याचे कारण समन्वयाने काम करणारी टीम आणि ग्राहकांचा प्रचंड विश्वास

कोणत्याही कंपनीकडून सामान्य ग्राहकांना त्यांच्या गरजा पूर्ण व्हाव्यात ही माफक अपेक्षा असते. सामान्य ग्राहकांना केंद्रस्थानी ठेवून आज जय महेश उद्योग समूह एका टप्प्यावर उभा असला तरी भविष्यातही खूप काम करण्याची सामाजिक बांधीलकी जपण्याची गरज आहे, अशीही माहिती सारडा यांनी 'वर्तमान'शी बोलताना दिली. ग्राहकांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देणे, हे आमचं आद्यकर्तव्य आहे.

त्या कर्तव्याप्रती बांधील राहून जय महेश उद्योग समुहाचा डोलारा बहरत आहे. काळानुरूप नवे-नवे बदल स्वीकारून जय महेश उद्योग समूह आधुनिक पध्दतीने सेवा देत आहे. जवळपास १७ हजार लोकांना जय महेश व्हेईकल मल्टीस्टेटने वाहन कर्ज दिले आहे. जय महेश उद्योग समुहाने विविध पातळ्यांवर केवळ ग्राहकांचे हितच जोपासले आहे, अशीही प्रतिक्रिया कैलास सारडा यांनी दिली.

### 'कारउद्योग' ऑनलाईन प्लॅटफॉर्म

जय महेश ऑटो मॉलचे संचालक उज्वल भुतडा यांच्या संकल्पनेतून 'कारउद्योग' हे ऑनलाईन ॲप विकसित केले. आज या ऑनलाईन प्लॅटफॉर्मला लाखो युजर्सनी भेट दिली आहे. किमान ५ हजारांवर वाहने छायाचित्रासह या ॲपवर उपलब्ध आहेत. घरबसल्या आपल्या मोबाईलवर वाहने खरेदी-विक्रीसाठी जय महेश उद्योग समुहाने हे ऑनलाईन दालन सुरू केले आहे. त्याला लक्षवेधी प्रतिसाद मिळत आहे. एकीकडे ऑफलाईन कामे तर दुसरीकडे ऑनलाईन प्लॅटफॉर्म अशा दोन्हीही पातळीवर जय महेश उद्योग समूह नेटाने आधुनिक जगाबरोबर चालत आहे.

## संपादकीय

# यंग जनरेशन पुढील आव्हाने...

केवळ नोकरीसाठी शिक्षण ही संकल्पना घेवून जगणे चुकीचे आहे. उद्योगातील विविध क्षेत्रे तरूणांना खुणावत आहेत. बहु असोत सुंदर संपन्न की महा समृद्ध कृषिप्रधान देशाच्या युवापिढीने काय करायचं? मी तत्परता, तल्लीनता, तन्मयता हे तारूण्याचे तीन होकार नैराश्याच्या एका नकाराने मारले जातात. सद्यस्थितीत गुणवत्ताधारक युवकांनी चहा, भेळ, मिसळ, डोसा आणि वडा की पकोडा, काय विकायचं तरुणांनी? उच्चपदवी प्राप्त केल्यानंतरही नोकरीच नाही. राजकारणात भ्रष्टाचाराचे फोफावलेले पीक, चोर सोडून संन्याशाला फाशी, नोकरीच्या ठिकाणी भ्रष्टाचार आणि आता तर या काळानंतर सतत वाढता महागाईचा भस्मासुर विस्कटलेली आर्थिक घडी, उद्ध्वस्त मन:स्थिती, अशा अवस्थेत भारतामध्ये उच्चशिक्षण असून नोकऱ्या नसतील, तर मुलांनी करायचं काय? संधी मिळाली नाही, तर अनुभव कसा मिळेल? अनुभव डायरेक्ट काय मार्कलिस्ट जोडून येतो का? तरुणाईने नापास न होता गुणवत्ता, टक्केवारी, क्षमता असूनदेखील सगळ्यांवर पाणीच. परदेशात शिकून आपल्या मायदेशी कोणत्या नजरेतून मुलांनी यावे? कोणत्या आशेतून अपेक्षेने राहावे? मुले परदेशात का जातात शिक्षणासाठी. उच्चशिक्षण घेऊन परतल्यानंतर मात्र अगतिकता व सगळेच मार्ग थोपलेले. मुलांनी मात्र आपल्या पालकांनी लादलेल्या आज्ञा पाळायच्या आणि स्वप्न भरारीला छेद द्यायचा. शाळेच्या पुस्तकातील प्रतिज्ञेतील पहिल्याच पानातील समता कुठे जाते? प्रयत्न, जिद्द, मेहनत क्षणार्धात स्वप्नांचा चक्काचूर व्हावा, अशी दयनीय अवस्था तरुणाईची झाली आहे. गुणवत्तेतून कामे करू म्हटलं तर भ्रष्टाचाराचा निवडुंग फोफावतोय. सत्ताधिकाऱ्याचं आश्वासनांचं गवत माजलेय. आपल्याच नशिबानं प्रयत्न करू म्हटलं, तर आरक्षणाचं तण मात्र वयाच्या चार पटीने वाढले आणि गुणवत्तेतून करू म्हटलं तर संधी, भरती, अनुभव, यांच्यामध्ये जोडून येतो तो भ्रष्टाचार लपून वार करतोय. परवा एका वाढदिवसानिमित्त भांड्यांच्या दुकानात गेले. भांडी विकणाऱ्या त्या नोकराला विचारलं, कसं चाललंय दुकान? भांडीवाल्याच्या दुकानात काम करणारा मुलगा म्हणाला, चार महिने पगार होत नाही. आईला गावी पैसे पाठवावे लागतात. वेळी-अवेळी येणाऱ्या पावसामुळे शेतातील धान्य नासून गेलं. सांगा कसं जगायचं? वाट दिसेना रं देवा वाट दिसेना'. इतकी वाट लावून ठेवली आहे.मग अशा वेळी मात्र आपण मुलांचे समुपदेशन करायचे? आणि ते कसे? कुठून आणायचे परिस्थितीवर मात करण्याचे बळ? मी स्वतः गोदरेज कंपनीमध्ये व्यसनमुक्तीवर व्याख्यान देत असताना माझ्यासमोर बावीस वर्षाचा एक तरुण आला. त्याचा प्रश्न काळजाला भिडणारा. हा मुलगा डेलिवेजेसवर द्विपदवीधर सफाई कामगार म्हणून काम करत असताना नाईटला मात्र सीए'चा अभ्यास करत होता. चेहऱ्यावर प्रचंड ताण. त्याला पाहून असे वाटले गेले कित्येक दिवस हा मुलगा झोपला, जेवला असेल काय? या मुलांना जर कोवळ्या वयात पोक्त जखमा मिळाल्या, तर त्यांचं जगणं म्हणजे काय हो. मर्मभेदी कथा मुलगा परदेशातून एमबीए मेरिट शिकून स्टुडन्ट विजा संपल्यानंतर मायदेशी भारतात परतल्यानंतर मात्र नोकरीसाठी अथक प्रयत्नानंतर हाती काय, तर आता काय ९ /१० ते १२ तास काम करून महिन्याकाठी १०,००० पगार, काय होते हो १० हजारांत? घरी आलेल्या सफाई करणाऱ्या किंवा पेशंट सांभाळणाऱ्या व्यक्तीला देखील आपण पाचशे रुपये रोज देतो. गुणवत्ताधारक युवकांना सिक्युरिटी, लेबर, हेल्पर, डीटीपी, डिलिव्हरी बॉय, असे मुलांना लांबवर प्रवास करून हातात दोनशे - तीनशे रुपये रोजंदारीवर डेली वेजेसप्रमाणे काय येणार ९ आणि १० हजारांत. एकीकडे नॅशनलाईज बँकांना लुबाडणारे, थकवणारे अमराठी भाषिक मात्र वाचत आहेत. राजकारण्यांना पेन्शन असते, भत्ता असतो, पगार असतो, इतर सोयी-सुविधाही असतात आणि आता तर सरकारने आमदारांना घरे सुद्धा देण्याची घोषणा झाली आहे. मग मला सांगा सर्वसामान्यांचे काय? गरिबांचे काय? कमवायचे आणि खायचे काय? त्यांनी जगावे कसे, काय करावे प्रश्नचिन्ह? गगनाला भिडणारे भाव, महागाई, भ्रष्टाचार, चोरी, लुटमार, व्यसनाधीनता, रोगराई आणि भरीस भर राजकारण या सगळ्यांशी भरडला जातो तो युवक. यात समाजातील युवाशक्तीला केवळ झेंडे खांद्यावर घेण्याशिवाय आणि सतरंज्या उचलण्याशिवाय पर्यायच उरला नाही का? एका मातेने मला विचारलेला हा प्रश्न मी निरुत्तर. सध्या नेमके काय सुरू आहे. साऱ्या गावाची मुले झेडपी, बीएमसी शासकीय शाळेत शिकतात. पण, आपली मुले मात्र आपण परदेशात पाठवून मायदेशी परत आल्यावर त्यांना राजकीय वारसा कसा मिळेल, याकडे राजकारणी लोकांचा कल दिसत आहे. त्यामुळे त्यांना काय जाणीव होणार की नोकऱ्या, रोजगारांचे हाल कधी ऐकलेत काय. यांची मुले सीमेवर लढताना कधी ऐकले का? यांची मुले शेतात राबताना कधी ऐकले का? त्यांची मुले संघर्ष करताना पाहिली आहेत का? दोन कोटी नोकऱ्या देतो म्हणे, कुठे गेल्या नोकऱ्या? तोंडाला पाने पुसली जातात. निवडणूक आली की मात्र युवा पिढीचा वापर केला जातो. भारताने तशी शिक्षणपद्धती का अवलंबू नये? दर्जेदार शिक्षण द्यावे. भविष्यात करिअरच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात. बलसागर भारत होवो, विश्वात शोभुनी राहो'! खऱ्या अर्थाने प्रचलित होण्यासाठी स्वामी विवेकानंदांच्या युवाशक्तीला कोलमडून जाताना पाहावत नाही. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या या भारतात बंधुभाव नित्य वसू दे, दे वरचि असा दे. जन्माच्या दाखल्यापासून शाळेचा प्रवेश ते नोकरीसाठी फॉर्म विकत घेतानासुद्धा वर्गीकरण १००/४०० रूपये हेच ना. देशाचे भविष्य, भवितव्य आज अत्यंत नाजूक परिस्थितीत आहे. आज प्रत्येक राजकीय प्रतिनिधींनी आपापल्या शैक्षणिक संस्थांमधून अशा तरुणाईला गुणवत्तेवर निकड म्हणून जर नोकऱ्या दिल्या. नि:पक्षपातीपणे जात-पात, धर्म, पंथ बाजूला ठेवून तरुणांच्या भविष्य, पुढील भवितव्याचा विचार केला, तर निश्चितच आपल्या भारत देशामध्ये आमूलाग्र परिवर्तन जे होईल ते जनहिताचे सार्वभौमत्वाचे ठरेल. हीच वेळ आली आहे, ऊठ तरूणा जागा हो सतर्क, संघर्ष आणि सक्षम हो. तुझी लढाई आता तुलाच लढायची आहे. फसव्या मृगजळाला फेकून दे. तू चाल रं गड्या तुला भीती कशाची? सक्षम हो तू सक्षम हो. तू आहेस झुंजार मानू नकोस हार. तुझी लढाई आता तुलाच जिंकायची आहे. यंग जनरेशनने आपल्या समोरील आव्हाने ओळखून पाऊले टाकण्याची गरज आहे.

# 'राजामौली'चा 'बाहुबली' फॅक्टर

**गेल्यावर्षी आलेल्या अल्लू अर्जुनच्या पुष्पा'चा पूर ओसरत नाही तोच आरआरआर' या आणखी एका तेलुगू सिनेमाने बॉक्स ऑफिसवर वर्चस्व मिळवलंय. बाहुबली' सिरीजनंतर दिग्दर्शक एस. एस. राजामौली पुन्हा एकदा आरआरआर'च्या माध्यमातून प्रेक्षकांसमोर आलेत आणि याही सिनेमाला प्रेक्षकांनी नेहमीसारखाच उत्स्फूर्त प्रतिसाद दिलाय.**




२०१५मधे बाहुबली: द बिगिनिंग' नावाचं वादळ देशभरातल्या थियेटरमधे घोंघावत होतं. त्यानंतर पुढचे काही महिने प्रभास, रम्या कृष्णन, राणा दगुबाती, सत्यराज, तमन्ना ही त्यातल्या कलाकारांची नावं तर याच्या त्याच्या तोंडी होतीच, त्याचबरोबर या सगळ्यांना एकत्र आणणारं नाव मात्र आदराने घेतलं जात होतं. ते नाव म्हणजे कोदुरी श्रीशैल श्री राजामौली म्हणजेच दिग्दर्शक एस. एस. राजामौली!

राजामौलींनी त्यांच्या दोन दशकांच्या दिग्दर्शकीय कारकिर्दीत एकूण बारा सिनेमे बनवलेत. या बाराही सिनेमांनी छप्परतोड कमाई करत राजामौलींना भारतीय बॉक्स ऑफिसच्या सिंहासनावर नेऊन बसवलंय, असं म्हणायला हरकत नाही. जागतिक स्तरावर भारतीय सिनेसृष्टीची मान उंचावणाऱ्या बाहुबली'नंतर राजामौली आरआरआर' घेऊन आलेत.

पहिल्या आठवड्यातच या सिनेमाने ग्लोबल बॉक्स ऑफिसवर ७१० कोटींचा गल्ला जमा केलाय. यात भारताचा वाटा ५६० कोटींचा असून, त्यातली २८० कोटींची कमाई तर निव्वळ आंध्रप्रदेश आणि तेलंगणामधेच झालीय. ज्युनियर नंदामुरी तारका रामाराव म्हणजेच ज्यु. एनटीआर, राम चरण तेजा आणि राजामौली या त्रिकुटाचा हा करिष्मा बॉक्स ऑफिसवर नवनवे रेकॉर्ड बनवत चाललाय.

सिनेमा हिट होण्याची कारणे

राजामौलींचे सिनेमे बाहुबली' येण्याआधीपासूनच प्रसिद्ध होते, पण ते त्यातल्या कलाकारांमुळे. प्रभासचा छत्रपती-हुकुमत की जंग', राम चरण तेजाचा मगधीरा', ज्यु. एनटीआरचा सिम्हाद्री- यमराज एक फौलाद', रवी तेजाचा विक्रमार्कुडू-आयपीएस विक्रम राठोड' ही त्यातली काही खास नावं. तसं म्हणायला २०१२ला आलेल्या नानीच्या इगा-मख्खी'ने त्यांचं नाव चर्चेत आलं होतं खरं, पण ते फार काळ चर्चेत टिकलं नाही. बाहुबली' आणि बाहुबली २'ने त्यांना खरी ब्रँड वॅल्यू मिळवून दिली. २०१७च्या बाहुबली २'नंतर राजामौलींचा पुढचा सिनेमा कुठला असणार, याचा अंदाज लावत असतानाच राजामौलींनी आपल्या सोशल मीडिया अकाऊंटवरून मेगा पॉवर स्टार' राम चरण तेजा आणि यंग टायगर' ज्यु. एनटीआरसोबत एक फोटो टाकला आणि चर्चांना उधाण आलं. मार्च २०१८मधे हे दोघेही कलाकार राजामौलींच्या नव्या सिनेमात एकत्र काम करणार असल्याचं अधिकृतरीत्या जाहीर झालं आणि उत्सुकता आणि अपेक्षेचा मीटर साहजिकच उंचावला. स्वातंत्र्ययोद्ध्यांच्या काल्पनिक कथेवर बेतलेल्या या सिनेमाचं नाव काय असणार हा एक मोठा प्रश्न होता. चित्रीकरण सुरु करण्यापूर्वी तात्पुरतं नाव आरआरआर' असं ठेवलं गेलं. ज्यु. एनटीआर, राम चरण तेजा आणि राजामौलींच्या आद्याक्षरांपासून हे नाव घेतलं गेलं होतं. पण आरआरआर'चा हॅशटॅग इंटरनेटवर अनपेक्षितपणे वायरल झाल्यानंतर याच नावावर शिक्कामोर्तब करण्यात आलं. सिनेमाच्या प्रमोशनमधे दोन मोठ्या स्टारच्या स्टारडमसोबतच या नावानेही मोठा वाटा उचलला. सिनेमाची गाणीही तितकीच महत्त्वाची आहेत. तेलुगू स्टार त्यांच्या नृत्यकौशल्यासाठी बरेच फेमस आहेत. कुणाचा डान्स जास्त चांगला हा इथल्या फॅनवॉरचा कळीचा मुद्दा आहे. या सिनेमातल्या नाटू नाटू' या अवघड डान्स स्टेप्स असलेल्या गाण्यात तर चक्क ज्यु. एनटीआर आणि राम चरण तेजा एकत्र थिरकताना दिसलेत. आलिया भटच्या वाढदिवसाला रिलीज झालेल्या शोले' गाण्यातूनही स्वातंत्र्ययोद्ध्यांना मानवंदना देताना प्रादेशिक अस्मितेला हात घालणारं मार्केटिंग बघायला मिळालं.

मल्टीस्टारर सिनेमाची क्रेझ

सध्याची तेलुगूभाषिक तरुणाई अशाच एका कॉम्बोच्या प्रतीक्षेत होती. तेलुगू सिनेसृष्टीत ढीगभर सुपरस्टार आहेत, पण त्यांचं एकमेकांसोबत स्क्रीन शेअर करण्याचं प्रमाण फारच कमीय. या स्टारडमच्या गर्दीचं पिढीनुसार वर्गीकरण करायचं झालं तर पहिल्या पिढीत ज्यु. एनटीआरचे आजोबा नटरत्न' एनटीआर आणि नागार्जुनचे वडील नटसम्राट' एएनआर म्हणजेच अक्किनेनी नागेश्वर राव ही जोडी बरीच लोकप्रिय होती. पुढच्या पिढीने मात्र अशा कॉम्बोमधे फारसा रस दाखवला नाही. सगळेच स्टार सोलो हिट देत चालले होते. त्यानंतर बऱ्याच उशिराने म्हणजे २०१३मधे आलेल्या सितम्मा वाकित्लो सिरीमल्ले चेट्टू-सबसे बढकर हम २'मधे विक्टरी' व्यंकटेश आणि प्रिन्स' महेश बाबू एकत्र स्क्रीन शेअर करताना दिसले. तेलुगू स्टारडमच्या दुसऱ्या पिढीचा हा पहिला मल्टीस्टारर सिनेमा ठरला. आता चाहत्यांची तिसऱ्या पिढीतल्या कलाकारांनीही एकत्र यावं अशी इच्छा आणखीनच प्रबळ झाली. त्यानंतर २०१४मधे स्टायलिश स्टार'

आज-काल

**प्रथमेश हळंदे**

अल्लू अर्जुन आणि राम चरण तेजा यांचा येवाडू' आला. पण दोघेही आमनेसामने आले नव्हते. त्यानंतर २०१५मधे नॅचरल स्टार' नानी आणि राऊडी स्टार' विजय देवरकोंडा यांचा येव्वडे सुब्रमण्यम-ये है जिंदगी' आला, पण तेव्हा विजय स्टारडमपासून बराच लांब होता. २०२२मधे आलेल्या बंगारराजू'मधे युवा सम्राट' नागार्जुन आणि ज्यु. युवा सम्राट' नागा चैतन्य ही अक्किनेनी घराण्याची दुसरी आणि तिसरी पिढी झळकलीय. नटरत्न' एनटीआर यांच्या शेवटच्या मनम-दयाळू' या २०१४ला आलेल्या सिनेमात तर अक्किनेनी घराण्याच्या तिन्ही पिढ्या दिसल्या होत्या. पहिल्या पिढीतले एनटीआर, दुसऱ्या पिढीतला नागार्जुन आणि नागा चैतन्य-मिसाईल स्टार' अखिल ही तिसरी पिढी या सिनेमात दिसली होती. पण आता रामचरण तेजा आणि ज्यु. एनटीआरच्या अभिनयाने नटलेला आरआरआर' हा खऱ्या अर्थाने तिसऱ्या पिढीचा पहिला मल्टीस्टारर सिनेमा ठरतोय.

राजामौली फॅक्टर

आरआरआर'च्या यशात जितका वाटा ज्यु. एनटीआर आणि राम चरण तेजाच्या स्टारडमचा आहे, चलाख मार्केटिंग आणि प्रमोशनचा आहे, त्याहून कितीतरी पटीने मोठा वाटा एकट्या राजामौलींचा आहे. राजामौलींच्या सिनेमाची सूत्रं आधीपासूनच ठरलीयत आणि प्रत्येक सिनेमात ती इतकी फिट बसवली जातात की सिनेमा हमखास यशस्वी ठरतो. या सुत्रांनाच एकत्रितपणे राजामौली फॅक्टर' असं म्हणता येईल. पौराणिक कथांचे संदर्भ, नायकाची ओळख करून देणारे प्रसंग, नायक आणि सहनायकातले अंतर्गत वाद, उत्कंठेच्या शिखरावर नेऊन ठेवणारे इंटर्वल, नायक-खलनायकाच्या बलस्थानांची ओळख करून देणारे इंटर्वल, कथेच्या शेवटपर्यंत वचनांमधे बांधले जाणारे नायक, नायक वापरत असलेलं वैशिष्ट्यपूर्ण हत्यार, भव्यदिव्यतेची जाणीव करून देणारे कॅमेरा अँगल्स, कथेला कलाटणी मिळवून देणारे भावनिक फ्लॅशबॅक अशी अनेक सूत्रं राजामौलींच्या सिनेमामधे चपखलपणे बसवलेली दिसतात. आरआरआर'मधेही रामायण-महाभारताचा संदर्भ वापरला गेलाय. राम चरण तेजाचं शेवटी स्वातंत्र्ययोद्धे अल्लुरी सीताराम राजू यांच्या रुपात दिसणं प्रभू श्रीरामांची आठवण करून देतं. स्वातंत्र्ययोद्धे कुमारम भीम यांची भूमिका साकारणारा ज्यु. एनटीआर बुलेट उचलून फिरवताना महाभारतातला गदाधारी भीम वाटतो. राम चरण तेजा आणि सीतेच्या भूमिकेतल्या आलियाची भेट घालून देताना ज्यु. एनटीआर हनुमानाचं प्रतिकात्मक रूप दर्शवतो. या सिनेमात राम चरण तेजा अग्नितत्त्वाचं तर ज्यु. एनटीआर जलतत्त्वाचं प्रतिनिधित्व करताना दिसतो. या दोन्ही भिन्न व्यक्तिमत्त्वांना एकत्र आणण्याचं अशक्यप्राय काम आरआरआर'ने केलंय. दोघेही वेगवेगळ्या वचनांनी बांधले गेले असले तरी त्यांचा हेतू शेवटी एकच असल्याचा दिसून येतो. राम चरण तेजाचं एकट्याने गर्दीला सामोरं जाणं असो किंवा यंग टायगरची खऱ्याखुऱ्या टायगरसोबत होणारी चकमक, दोघा हिरोंच्या एंट्रीचे हे प्रसंग पुरेपूर टाळ्या आणि शिट्ट्या वसूल करतात.

बॉक्स ऑफिसवर वर्चस्व

आपल्या प्रत्येक सिनेमाच्या मदतीने बॉक्स ऑफिसच्या यादीतले वेगवेगळे रेकॉर्ड्स मोडण्याचा ध्यासच राजामौलींनी घेतला असावा. २५ मार्च २०२२ला रिलीज झालेला आरआरआर'ही त्यांच्या याच ध्यासपूर्तीचा एक भाग आहे असं म्हणलं तर वावगं ठरणार नाही. पहिल्या दिवसापासूनच आरआरआर'ने बॉक्स ऑफिसवर पक्की बैठक जमवलीय. पहिल्याच दिवशी ग्लोबल बॉक्स ऑफिसवर तब्बल २२३ कोटींचा गल्ला जमवून आरआरआर'ने ओपनिंगला सर्वाधिक कमाई करणाऱ्या भारतीय सिनेमांच्या यादीत पहिला क्रमांक मिळवलाय. याआधी हे स्थान राजामौलींच्याच बाहुबली २'कडे होतं. ओपनिंग विकेंडला तर आरआरआर'ने द बॅटमॅन' आणि द लॉस्ट सिटी'सारख्या बिग बजेट सिनेमाला मागे टाकत आंतरराष्ट्रीय थियेटरमधेही आपलंच वर्चस्व निर्माण केलं. आरआरआर'च्या हिंदी वर्जननेही चांगली कमाई केलीय. लॉकडाऊननंतर यशस्वी ठरलेल्या हिंदी सिनेमांच्या यादीत तो आत्ता दुसऱ्या क्रमांकावर आहे. आता हा सिनेमा दमदार पावलं टाकत १००० कोटींकडे वाटचाल करतोय. भारतात हा आकडा फक्त दंगल' आणि बाहुबली २'लाच गाठता आलाय. जर आरआरआर'ने हा आकडा गाठला, तर चीनमधे रिलीज न होऊनही १००० कोटींचा व्यवसाय करणारा हा पहिला सिनेमा ठरू शकतो.

नॉन-बाहुबलीचा शिक्का

बाहुबली'च्या घवघवीत यशानंतर इतर सिनेमांचं व्यावसायिक यश नोंदवण्यासाठी नॉन-बाहुबली' ही नवी संकल्पना तेलुगू सिनेसृष्टीत रूढ झाली. आता कोणत्याही नव्या तेलुगू सिनेमाने बॉक्स ऑफिस वरचा एखादा रेकॉर्ड मोडला तर माध्यमांतून अमुक रेकॉर्ड मोडणारा नॉन-बाहुबली सिनेमा' असा उल्लेख त्या सिनेमाचा केला जातो. स्वतः राजामौलींनाही हा नॉन-बाहुबलीचा शिक्का आवडला नव्हता. खरं तर, हा उल्लेख त्या रेकॉर्डब्रेकिंग सिनेमाची मूळ ओळखच संपवतोय पण गेल्या सात वर्षात बऱ्याच मोठ्या सिनेमांना याच तुलनेला सामोरं जावं लागलंय. गेल्या वर्षी आलेला बहुचर्चित पुष्पा'ही या तुलनेतून सुटला नव्हता. आरआरआर' मात्र आता हा उल्लेख मोडीत काढतोय. आरआरआर'ने केलेली कमाई बघता, नॉन-बाहुबलीचे शिक्के मारणारे हात आता थंडावलेत. त्याऐवजी आणखी एक सुपरहिट तेलुगू सिनेमा म्हणून या सिनेमाची नोंद घेतली जातेय. अगदी हेच चित्र राजामौली आणि इतर निर्माते, दिग्दर्शकांना अपेक्षित आहे.

# महागाईचा भडका कधी थांबणार?

**पेट्रोल, डिझेल, घरगुती गॅस आणि सीएनजी या सगळ्यांचेच भाव आकाशाला भिडल्यामुळे चलन फुगवटा होणार आहेच. पण त्यामुळे लोकांची मागणी घटणार आहे आणि त्याचा देशाच्या जीडीपीवर प्रतिकूल परिणाम होण्याची भीती आहे. पेट्रोलनंतर भारताची परकीय गंगाजळी सर्वाधिक खर्ची पडते, ती खाद्यतेलांवर. खाद्यतेलांचं उत्पादन वाढावं, यासाठी केंद्र सरकारचे प्रयत्न असून, त्याला गती मिळायला हवी.**




सखी सैंया तो खूब ही कमात है
महँगाई डायन खाए जात है
हर महिना उछले है पेट्रोल,
डिझल का भी ब गया मोल,
शक्कर बाई के काहे बोल,
गुस्सा बाँसमती धान मरी जात है'

आमीर खान प्रॉडक्शनच्या बारा वर्षापूर्वी आलेल्या पीपली लाईव' या सिनेमात हे गाणं होतं. उत्तर प्रदेश, उत्तराखंड, पंजाब, मणिपूर आणि गोवा या राज्यांमधल्या विधानसभा निवडणुका पार पडल्यानंतर साडेचार महिन्यांनी पेट्रोल आणि डिझेलच्या दरात नुकतीच दर लिटरमागे पावणेदोन रुपयांची वाढ झालीय. त्यामुळे या गाण्याचे बोल आठवले.

ही वाढ इथंच थांबून राहणार नाही, तर टप्प्याटप्प्याने किमतीत आणखी भर पडण्याचीच शक्यता आहे. गॅस सिलिंडरच्या किमतीतही ५० रुपयांनी वाढ झाली असून, याआधी गेल्या वर्षी त्यात शंभर रुपयांची वाढ झाली होती.

जगभरात तेलबियांच्या उत्पादनात घट

रशिया आणि युक्रेन युद्धामुळे इंधनदर वाढले, त्याचप्रमाणे सूर्यफूल, सोयाबीन आणि शेंगदाणा तेलाच्या किमतींतही लक्षणीय वाढ झालीय. भारतात जवळजवळ ७० टक्के सूर्यफूल तेल हे युक्रेनमधून आयात केलं जातं. तिथून होणारी आवकच कमी झाली आहे आणि त्यात व्यापाऱ्यांनी साठेबाजी केली आहे.

जगभरात तेलबियांच्या उत्पादनात लक्षणीय घट झाली आहे. त्यामुळे खाद्यतेलांच्या भावात फेब्रुवारीतच डब्यामागे १०० ते २०० रुपयांची वाढ झाली होती. मलेशिया आणि इंडोनेशिया यासारख्या देशांनी कच्च्या पामतेलाच्या भावात टनामागे ५०-६० डॉलरची वाढ केली होती. आपल्याकडे एकूण मागणीच्या ७० टक्के खाद्यतेल हे आयात केलं जातं. त्यामुळे जगभरात बाजार तापला की, आपल्याकडे खाद्यतेलाच्या किमती वाढतात.

जगात खाद्यतेलाची सर्वाधिक आयात चीनमधे केली जाते आणि त्यानंतर भारताचा क्रमांक लागतो. पेट्रोलनंतर भारताची परकीय गंगाजळी सर्वाधिक खर्ची पडते, ती खाद्यतेलांवर.

विशेष

**हेमंत देसाई**

खाद्यतेलांचं उत्पादन वाढावं यासाठी केंद्र सरकारचे प्रयत्न असून, त्याला गती मिळणं आवश्यक आहे.

दरवाढीचा साखळी परिणाम

राजस्थान आणि गुजरातमधल्या शेतकऱ्यांनी अपेक्षेएवढे दर न मिळाल्याने जिऱ्याची लागवडच कमी केली आहे. त्यांनी डाळ आणि बटाटा लागवडीवर लक्ष्य केंद्रित केलं असून, जिऱ्याच्या उत्पादनात मोठी घट झाली आहे. त्यामुळे रोजच्या रोज गृहिणी स्वयंपाकात जे जिरं वापरतात, ते आता महागलंय. आताच जिरं किलोला २१० रुपयांवर गेलं असून, लवकरच ते पावणेतीनशे ते तीनशे रु. किलोपर्यंत जाईल, असं सांगितलं जातंय.

पेट्रोल, डिझेल ही इंधनं वाहतुकीसाठी वापरली जातात. त्यामुळे त्यांचे दर वाढले की रेल्वे, सार्वजनिक किंवा खासगी बसेस, ट्रक, टेम्पो या वाहनांमधून मालवाहतूक केली तर उत्पादन खर्च वाढतो. शिवाय खासगी कंपन्यांमधे काम करणाऱ्या व्यक्तींचा प्रवासखर्चही वाढतो. हा वाढता खर्च विचारात घेऊन, मालाच्या आणि सेवांच्या किमतीत सार्वजनिक, खासगी कंपन्या वाढ करतात.

एका वस्तूचे भाव वाढले की, कच्चा माल म्हणून ती वस्तू वापरणाऱ्या अंतिम उत्पादनांचे किंवा सेवांचे भावही वाढतात. पेट्रोल, डिझेलच्या दरवाढीचा हा साखळी परिणाम अर्थव्यवस्थेवर होत असतो आणि म्हणूनच महागाई वाढते.

कच्च्या तेलाच्या किमतीत वाढ

गेल्या वेळी तेलविक्री कंपन्यांनी ब्रेंट क्रूडच्या किमती ४५ टक्क्यांनी वाढवून, त्या बॅरलला ११८ डॉलर्सवर नेऊन ठेवल्या होत्या. ४ नोव्हेंबर २०२१ला केंद्र सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरच्या अबकारी करांमधे अनुक्रमे पाच आणि दहा रुपयांची लिटरमागे कपात केली. तेव्हापासून तेल कंपन्यांनी दरवाढ केली नव्हती. एरवी पेट्रोलियम उत्पादनांच्या पंधरा दिवसांच्या सरासरी बेंचमार्क प्रायसेस' किंवा आधार किमतींच्या अनुसार, पेट्रोल-डिझेलच्या भावांत दररोज बदल केला जात असतो.

# वाचाळवीर किरीट सोमय्यांना तुरूंगात पाठवा

## संतप्त जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव यांची मागणी



प्रतिनिधी

माजलगाव : वाचाळवीर किरीट सोमय्या याला आयएनएस विक्रांत युद्धनौका स्मारकाच्या नावाखाली केलेल्या करोडो रूपयांच्या भ्रष्टाचाराच्या विरोधात देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून त्वरित अटक करून त्याची रवानगी जेलमध्ये करावी, यासाठी बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने माजलगावात सोमय्याच्या पुतळ्याला जोडे मारो आंदोलन करून त्यांचा पुतळा जाळण्यात आला.

माजलगाव येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकात गुरूवारी दुपारी झालेल्या या आंदोलनादरम्यान शिवसेना जिल्हाप्रमुख आप्पासाहेब जाधव म्हणाले की, भारतीय जनता पक्ष ही महाराष्ट्र महाविकास आघाडीचे सरकार पडावे म्हणून दोन वर्षापासून प्रयत्न करीत आहे परंतु सरकार पडत नाही. म्हणून केंद्रीय यंत्रणांचा दुरूपयोग करून आज शिवसेना नेत्यांना अडचणीत आणण्यासाठी किरीट सोमय्यासारख्या वाचाळवीराचा उपयोग करत आहेत. आंदोलनात शिवसैनिकांनी किरीट सोमय्या यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याला जोडे मारून पुतळ्याचे दहन केले. किरीट सोमय्यावर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करून त्याला त्वरित अटक करावी, असे निवेदन यावेळी प्रशासनाला देण्यात आले.

या आंदोलनात उपजिल्हाप्रमुख रामराजे सोळंके, शिवाजी कुलकर्णी, जिल्हा संघटक रामदास ढगे, सहसंघटक अशोक गाढवे, केज तालुकाप्रमुख रत्नाकर शिंदे, परळी तालुकाप्रमुख व्यंकटेश शिंदे, अंबाजोगाई तालुकाप्रमुख अर्जुन वाघमारे, धारूर तालुकाप्रमुख बाळासाहेब कुरंद, वडवणी तालुकाप्रमुख संदीप माने, अंबाजोगाई शहरप्रमुख गजानन मुडेगांवकर, युवा सेना उपजिल्हा युवाधिकारी राहुल सुरवसे, माजलगाव शिवसेना विधानसभा समन्वयक दासू बादाडे, उपतालुकाप्रमुख अतुल उगले, नामदेव सोजे, माऊली कदम, वडवणी उपतालुकाप्रमुख बाळासाहेब बादाडे, तालुका सचिव प्रभाकर धरपडे, युवासेना तालुका युवाधिकारी महेश थेटे, शहर युवाधिकारी विशाल थावरे, बालाजी शेप, रमेश चोंडे, राजू पांडे, कल्याण बल्लाळे, संभाजी पाष्टे, नारायण तौर, बाळासाहेब मेंडके, सुखदेव धुमाळ, करण थोरात, कल्याण मोहिते, महादेव वैराळे, कैलास कावरे, प्रदीप तांबे, अनिल ढगे, अभिजित देडे, रहीम फिटर, रूपेश घोडके, भरत पाष्टे, अनिकेत शिंदे व संतोष चौधरी यांच्यासह शिवसैनिक उपस्थित होते.



# शेखर भाकरेंच्या भारूडाने माजलगावकरांना ‘बुरगुंडा’

प्रतिनिधी

माजलगाव : मराठी नववर्ष म्हणजेच गुढीपाडव्यानिमित्त गुढीपाडव्याच्या पूर्वसंध्येला संस्कार भारती माजलगाव शाखेकडून भारूडरत्न निरंजन भाकरे यांचे चिरंजीव युवा भारूडकार शेखर निरंजन भाकरे यांचा भारूडरंग हा कार्यक्रम माजलगाव येथील वैष्णवी मंगल कार्यालयात दि.१ एप्रिल रोजी आयोजित करण्यात आलेला होता. दरम्यान, शेखर भाकरे यांच्या भारूडाने माजलगावकरांना बुरगुंडा झाला असल्याचा अनुभव आला.

या कार्यक्रमात शेखर भाकरे व त्यांचे सहकलाकार यांनी वेगवेगळे सोंग घेऊन भारूड सादरीकरण केले.

मागील दोन वर्षापासून कोरोनामुळे कठोर निर्बंध असल्याने संस्कार भारती माजलगाव शाखेला मागील दोन वर्षात कुठलेही सांस्कृतिक कार्यक्रम घेता आले नाही त्यामुळे यावर्षी संस्कार भारतीचे सर्व सदस्य मागील एक महिन्यापासून गुढीपाडव्याचा ’भारुडरंग’ असा हा आगळावेगळा कार्यक्रम थाटामाटात संपन्न करण्याच्या तयारीला लागलेले होते आणि त्यांच्या या तयारीला माजलगावकरांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद देत कार्यक्रमाच्या प्रवेशिका घेऊन माजलगावातील रसिक-प्रेक्षक या कार्यक्रमासाठी उपस्थित राहिले संपूर्ण कार्यालय भरले होते.

संस्कार भारतीच्या ध्येय गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. यानंतर देवगिरी प्रांताचे अध्यक्ष भरतअण्णा लोळगे यांनी माजलगाव शाखेच्या नवीन कार्यकारिणीची घोषणा केली. व तद्नंतर शेखर भाकरे यांच्या भारुड सादरीकरणास सुरुवात झाली व त्यांच्या ’बुरगुंडा होईल बया गं’ या भारुड सादरीकरणाने माजलगावातील नागरिकांना बुरगुंडा झाला. शेखर भाकरे यांनी वेगवेगळे भारुड सादर करून सरळ व सोप्या भाषेत समाजाचे योग्य असे प्रबोधन केले. कार्यक्रमाची सांगता संपूर्ण वंदे मातरम् ने झाली. या कार्यक्रमास संस्कार भारतीच्या देवगिरी प्रांताचे अध्यक्ष भरत लोळगे, वझे, स्नेहलताई पाठक, प्रकाश दुगड, तुकाराम येवले, महेंद्र मस्के, व माजलगावातील रसिक-प्रेक्षक उपस्थित होते. हा कार्यक्रम व्यवस्थित, शिस्तबध्द व सुरळीत पार पाडण्यासाठी संस्कार भारती माजलगाव शाखेच्या प्रत्येक सभासदाने अथक परिश्रम घेतले.

# संजय बियाणी यांच्या मारेकऱ्यांना गजाआड करा

## माजलगाव माहेश्वरी समाजाची एकमुखी मागणी

प्रतिनिधी


माजलगाव : नांदेड येथील बांधकाम व्यावसायिक संजय बियाणी यांची मंगळवारी नांदेड येथे गोळ्या घालून हत्या करण्यात आली. या घटनेच्या निषेधार्थ माजलगाव माहेश्वरी सभेकडून निषेध नोंदवून तहसिलदार वर्षा मनाळे यांना निवेदन देण्यात आले.



यावेळी माहेश्वरी सभेचे तालुकाध्यक्ष विनोद जाजू, उमेशकुमार जेथलिया, जुगलकिशोर झंवर, बालाप्रसाद भुतडा, कमलकिशोर लड्डा, इंदाणी, राधेश्याम जेथलिया, गोविंद बजाज, गोपाल नावंदर, टिल्लू लडडा, गोपाल मानधने, डॉ.दिनेश भुतडा, डॉ.श्यामसुंदर काकाणी, रमेश कासट, गजानन लाहोटी, सागर मानधने, शिरीष नावंदर, सत्यप्रकाश मालपाणी, विष्णू भुतडा, विजय भुतडा, विकास मालपाणी, रामानंद झंवर, प्रशांत गिल्डा, श्रीकिशन कालिया, दिलीप ललवाणी, दिगंबर महाजन, प्रदीप भुतडा, महेश भुतडा व ओमप्रकाश भुतडा उपस्थित होते.

### महावीर जयंतीनिमित्त शोभायात्रा





माजलगाव : जैन धर्माचे चोविसावे तीर्थकर श्री भगवान महावीर स्वामी यांचा जन्म कल्याणक महोत्सव सकल जैन समाज संघाच्या वतीने उत्साहात साजरा झाला. जैन मंदिरापासून भगवान महावीर स्वामींच्या प्रतिमेची शोभायात्रा काढण्यात आली. यावेळी व्यापारी धनराज बंब यांनी उभारलेल्या पाणपोईचे उद्‌घाटन करण्यात आले.





# बाबुराव पोटभरे स्वकर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व

## माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी

माजलगाव : बाबुराव पोटभरे हे स्वकर्तृत्वावर निर्माण झालेले नेतृत्व आहे. विदेशात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीसाठी त्यांना आलेले निमंत्रण हे माजलगाव तालुक्यातील तमाम जनतेसाठी भूषण असल्याचे प्रतिपादन माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील यांनी केले.

बाबुराव पोटभरे यांना भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी करण्यासाठी लंडन येथे आमंत्रित केले आहे. याबद्दल तालुका पत्रकार संघातर्फे गुरूवारी त्यांचा सर्वपक्षीय सत्कार करण्यात आला. यावेळी होके पाटील बोलत होते. यावेळी भाजपचे नेते रमेशराव आडसकर, मोहनराव जगताप, माजी नगराध्यक्ष शेख मंजूर, सभापती संभाजी शेजुळ, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अप्पासाहेब जाधव, अच्युतराव लाटे, माजी सभापती नितीन नाईकनवरे, भाजपचे तालुकाध्यक्ष अरूण राऊत, ओमप्रकाश मालपाणी, श्रीहरी मोरे, जयदत्त नरवडे, राजेश घोडे, मनोहर डाके, डॉ.अशोक तिडके आदी उपस्थित होते. प्रारंभी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी बाबुराव पोटभरे यांचा सर्वपक्षीय सत्कार करण्यात आला. यावेळी पोटभरे म्हणाले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या आशीर्वादामुळेच मी परदेशातही त्यांचे विचार रुजवू शकलो. प्रास्ताविक तुकाराम येवले, सूत्रसंचालन उमेश जेथलिया यांनी केले. हरीष यादव यांनी आभार मानले.

# आमदारांना घरे हवीतच कशाला : भाई ॲड.गोले पाटील

प्रतिनिधी

माजलगाव : दोन दिवसांपूर्वी महाराष्ट्र शासनाने तीनशे आमदारांना घरे देण्याचे जाहीर केले आहे, वास्तविक पाहता सर्व आमदार कोटयावधींच्या मालमत्तेचा मालक आहे. याशिवाय अनेक कंपन्या, मोठमोठे उद्योग, कारखानदारी, शिक्षण संस्था, अनेक सहकारी संस्था यांच्या माध्यमातून ही मंडळी कोट्यावधी रूपयांचा प्रत्येक वर्षी भ्रष्टाचार करत आहे,शासन त्यांच्या अनेक संस्थांना कर्जाच्या खैराची वाटप करून त्यामध्ये सवलती देत आहे. तरी आमदारांना घरे देण्याचा अट्टाहास का? असा सवाल ॲड.नारायण गोले पाटील यांनी केली आहे.



ते पुढे म्हणाले की, याशिवाय त्यांना लाखो रूपयांची भत्ते, मानधन, कोटयावधी रुपयांच्या सुखसुविधा याहीपुढे त्यांना कार घेण्यासाठी बिनव्याजी तीस लाख रूपयांची रक्कम दिली जाते. एवढ्या सुविधा, सवलती त्यांना पूर्वी दिलेल्या असताना घरे देण्याचा अट्टहास नेमका कशासाठी. आज राज्यात हजारो शेतकरी शेतीमालाला भाव मिळत नाही म्हणून, घेतलेले कर्ज फिटत नाही म्हणून, मुलींचे लग्नासाठी पैसे नाहीत म्हणून, स्वतःच्या गळ्याला फास लावून घेत आहेत. परंतू, शासनाला शेतकऱ्यांच्या आत्महत्येकडे पाहायला वेळ नाही पणराज्याच्या अर्थव्यवस्थेचा भुर्दंड बनलेला आमदार या राज्यकर्त्यांना उपेक्षित वाटतो. बेरोजगारी वाढत आहे, शिक्षण व्यवस्थेतील काळाबाजार थांबत नाही. इतर प्रश्नांवर तोडगा काढायला शासनाकडे वेळ नाही, पैसा नाही, ही बाब गंभीर आहे, महाराष्ट्र शासनाने तीनशे आमदारांना घरे देण्याचा निर्णय त्वरित परत घ्यावा, अन्यथा आमदारांना खैरात वाटण्यात दंग असलेल्या सरकारला जागे करण्यासाठी शेतकरी कामगार पक्षातर्फे शेतकऱ्यांचा कष्टकऱ्यांच्या एकीने तिव्र लढा उभा करू, असा इशाराही नारायण गोले पाटील यांनी दिला आहे.

# अबब! माजलगावात दूध ७० रूपये लीटर

प्रतिनिधी

माजलगाव : पेट्रोल, डिझेलमुळे सर्वत्र महागाईचा चटका बसत असून या वाढत्या महागाईत दुग्धव्यावसायिक शेतकरी व डेअरी चालकांचे देखिल आर्थिक नुकसान होत असल्याने माजलगाव शहरात ७० रूपये प्रतिलिटर दुध करण्याचा निर्णय गुरूवार, दि.७ रोजी दुग्धव्यावसायिक व दुध डेअरी असोशिएनच्या वतीने घेण्यात आला.

शहरातील बायपास रोडवर असलेल्या तुळजाभवानी मंदिरात दुध डेअरी असोशिएशनच्या वतीने दुग्धव्यावसायिक शेतकरी व दुध डेअरी चालकांची बैठक घेण्यात आली. या बैठकीस दुध डेअरी असोशिएशनचे अध्यक्ष पांडुरंग लांडे, उपाध्यक्ष पांडुरंग कुलथे, सचिव रवि शेजुळ यांची उपस्थिती होती. बैठकीत दुध दरवाढीबाबत चर्चा करत म्हैशीचे दुध ७० तर गायीचे दुध ६० रूपये प्रतिलिटर करण्याचा निर्णय घेण्यात आला. बैठकीस धनंजय आगे, महेश दांडे, माउली सक्राते, अनिरूध्द कुरे, मुंजा शेंडगे, योगेश धुमाळ, भिमराव पवार, हरी सवरा, राजू सवरा, रामा डामले, हरीभाउ ढगे, दत्ता नावडकर, कैलाश झगडे, कृष्णा लिंगे, दत्ता हिंगण, प्रदिप खांडेकर, विलास कदम, विक्रम खांडेकर, दिपक नावडकर, शिवाजी पवार, गणेश नावडकर, संतोष मोरे, बाबा कदम, अशोक जगदाने, संजय क्षिरसागर यांचेसह दुग्धव्यावसायिक उपस्थित होते. दरम्यान या निर्णयाची अमंलबजावणी सर्व दुध डेअरी चालकांनी करावी असे आवाहन दुध डेअरी असोशिएशनच्या वतीने करण्यात आले आहे.



# डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या दूरदृष्टीने सामाजिक विकास

## ज्येष्ठ पत्रकार तुकाराम येवले यांचे मत

प्रतिनिधी

माजलगाव : भारतामध्ये अनेक महापुरुषांनी आपले जीवन देशासाठी वाहुन घेतले. मानव जातीच्या कल्याणासाठी सर्व महापुरूषांनी कार्य केले. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर घटनेचे शिल्पकार म्हणून ओळखले जातात. भारतीय राज्यघटना विश्वात सर्वश्रेष्ठ आहे, असे प्रतिपादन पत्रकार संघाचे जिल्हा अध्यक्ष तुकाराम येवले यांनी केले. ते श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव येथे रासेयो विभाग व फीडबॅक कमिटी अंतर्गत डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महावीर जयंती निमित्ताने आयोजित व्याख्यान प्रसंगी बोलत होते.



व्यासपीठावर अध्यक्ष म्हणून लक्ष्मीकांत जोशी तर प्रमुख उपस्थितीमध्ये प्राचार्य डॉ.महेश देशमुख होते.प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ.महेश देशमुख म्हणाले की भारत ही त्यागाची भूमी आहे त्यागी पुरुषांचे विचाराचे वारंवार स्मरण करून विध्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी यासाठी आशा कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. अहिंसा सत्य, अपरिग्रह, ब्रम्हचर्य हे भगवान महावीर यांचे तत्व महत्वपूर्ण आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी १९१६ मध्ये कोलंबिया विध्यापिठात शिक्षण आणि संशोधन केले. ते ज्ञानपिपासू होते. त्यांनी लेखन वाचन प्रचंड केले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार, कृषिविषयक विचार, विजेसबंधी विचार, शिक्षणासबंधीचे विचार आजही मार्गदर्शक आहेत. एकूणच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार प्राचार्य डॉ.महेश देशमुख यांनी मांडले. स्वागतगीत कु.दिव्या वाघमारे आभार डॉ.गंगाधर उषमवार तर सूत्रसंचालन डॉ.कमलकिशोर लड्डा यांनी केले तर शांतिमंत्र उपप्राचार्य डॉ.गजानन होन्ना यांनी सांगून कार्यक्रमाची सांगता झाली.



